दैनिक
# ग्लोबल भारत
वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं
www.globalbharatlive.com
◆ औरंगाबाद ◆ वर्ष ५ वे ◆ अंक १८६ वा ◆ पाने ८ ◆ मुल्य ५ रु
dailyglobalbharat@gmail.com गुरुवार दि.०३ एप्रिल २०२५ संपादक - शरद खेमचंद अडागळे

# वक्फ दुरुस्ती विधेयक मध्यरात्री लोकसभेत मंजूर

## दान आपल्या मालमत्तेचे करता येते, सरकारी मालमत्तेचे नाही-अमित शाह



**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**नवी दिल्ली** - केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी काल (बुधवारी) संसदेत वक्फ दुरूस्ती विधेयक सादर केले होते. त्यांनंतर काल दुपारी १२ वाजल्यापासून आज मध्यरात्रीपर्यंत या विधेयकावर सभागृहात चर्चा झाली. यामध्ये सत्ताधारी खासदाऱ्यांनी विधेयकाच्या बाजूने मते व्यक्त केली. तर विरोधकांनी याला जोरदार विरोध केल्याचे पाहायला मिळाले.

आज मध्यरात्री झालेल्या मतदानानंतर वक्फ दुरूस्ती विधेयक लोकसभेत मंजूर झाले. यावेळी विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली. तर, विरोधात २३२ मते पडली. दरम्यान वक्फ दुरूस्ती विधेयकावरील मतदानाला पंतप्रधान नरेंद्र मोदी अनुपस्थित राहिल्याचे पाहायला मिळाले.

या विधेयकावर चर्चे करतांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही भाग घेत मोठा दावा केला आहे. ते म्हणाले, दान आपल्या संपत्तीचे केले जाऊ शकते. सरकारी जमिनींचे नाही. ते म्हणाले वक्फ एक प्रकारचे चॅरिटेबल एंडोरमेंट आहे. यात व्यक्ती पवित्र दान करते. दान अशाच गोष्टीचे केले जाते जी आपली आहे. सरकारी मालमत्ता अथवा इतर कुणाच्या मालमत्तेचे दान करता येत नाही. ही संपूर्ण चर्चा याच मुद्यावर आहे असे ते म्हणाले.

लोकसभेत बोलताना अमित शाह म्हणाले, मी या विधेयकाच्या बाजूने बोलत आहे. मला वाटते, एक तर निर्दोष भावनेने अथवा राजकीय कारणांमुळे सदस्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत आणि ते पसरवण्याचे कामही सुरू आहे. मी काही गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करेन. वक्फ एक अरबी शब्द आहे. याचा इतिहास काही हदीसशी संबंधित सापडतो. आज ज्या अर्थाने वक्फ शब्दाचा वापर केला जातो, त्याचा अर्थ आहे अल्लाहच्या नावावर मालमत्तेचे दान. आम्ही आज जो अर्थ समजत आहोत, तो इस्लाम चे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात अस्तित्वात आला.'

शाह काँग्रेसवर थेट हल्ला करताना म्हणाले, 'वक्फ विधेयकावर २०१३ मध्ये जे संशोधन आले, ते आले नसते, तर आज हे संशोधन आणण्याची गरज पडली नसती. त्यावेळी काँग्रेस सरकारने दिल्लीतील १२५ लुटियन्स मालमत्ता वक्फला दिल्या. उत्तर रेल्वेची जमीन वक्फला देण्यात आली. हिमाचलमध्ये वक्फ जमीन असल्याचा दावा करून एक मशीद बांधण्यात आली.' यावेळी शाह यांनी, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची काही उदाहरणे दिली ज्यावर विरोधकांनी गदारोळ केला आणि त्यांच्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप केला.

या चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, वक्फमध्ये गैर-इस्लामी गोष्टींना परवानगी दिली जाणार नाही. अशी कोणतीही तरतूद नाही. मतपेढीसाठी अल्पसंख्याकांना घाबरवले जात आहे. २०१३ मध्ये (पान ४ वर)

## आरबीआयच्या डेप्युटी गर्व्हनरपदी पूनम गुप्ता यांची नियुक्ती

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**नवी दिल्ली** - जागतिक बँकेच्या माजी अर्थतज्ज्ञ पूनम गुप्ता यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ७ ते ९ एप्रिल दरम्यान होणाऱ्या द्वैमासिक चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीपूर्वी ही नियुक्ती करण्यात आली. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्या या पदावर असणार आहेत. मायकल पात्रा सध्या या पदावर आहेत. पूनम गुप्ता सध्या नॅशनल कॉऊन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या महासंचालक म्हणून काम पाहतात. त्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्या आहेत आणि १६ व्या वित्त आयोगाच्या सल्लागार परिषदेच्या संयोजक म्हणून काम करतात. पूनम गुप्ता २०२१ मध्ये एनसीएईआरमध्ये सामील झाल्या, त्यांच्यासोबत वॉशिंग्टन डीसी येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) आणि जागतिक बँकेत वरिष्ठ पदांवर जवळजवळ दोन दशकांचा अनुभव आहे. शिवाय, गुप्ता यांनी मेरीलँड विद्यापीठ (यूएसए) च्या दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अध्यापनाची पदे भूषवली आहेत आणि दिल्लीतील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी सदस्य म्हणून काम केले आहे.

# राख गँगला सुतासारखे सरळ करणार

## बीडच्या मेळाव्यात पालकमंत्री अजित पवारांचा सुचक इशारा

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**बीड** - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस भवनमध्ये कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या व त्यांच्या अडचणी सोडवल्या. तसेच युवा संवाद मेळाव्यातून अजित पवार यांनी राख गँगला सुतासारखं सरळ करणार असल्याचं सांगितलं. बीडमध्ये सगळ्या गँग आहेत , राखेची गँग, वाळूची गँग या सगळ्या गँग आहेत. इथे या सगळ्या गँग सुतासारख्या सरळ करणार असल्याचं अजित पवार म्हणाले. बीड ही देवदेवतांची भूमी आहे. जनतेची सेवा करण्यासाठीचे बळ देण्याचे देवदेवतांना साकडे आहे. बीडकरांची बदनामी करणाऱ्या गोष्टी आपल्याला थांबवायच्या आहेत, असं अजित पवार म्हणाले. तसेच बीडमध्ये मराठा आणि वंजारी यांच्यात अनेकदा वाद दिसून आले आहेत. यावरही अजित पवारांनी भाष्य केलं आहे. जाती-जातीतील दुरावा आपल्याला संपवायचा आहे, असं अजित पवार यांनी सांगितले. तसेच प्रतिमा स्वच्छ ठेवा, असं आवाहन देखील अजित पवारांनी कार्यकर्त्यांना केलं. शेतीत आता एआय तंत्रज्ञानाचा वापर केला गेला पाहिजे. बीडमध्ये तारांगण केले जाणार आहे. विमानतळ जिल्ह्याच्या जवळ असले पाहिजे. टप्प्याटप्पाने राज्यातील विमानतळावर नाईट लँडिंग सुरू केले जाणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात - अंबाजोगाई येथील सुविधा वाढवण्यात येणार आहेत. पुढे जायचे असेल तर बेरजेचे राजकारण करत करत सर्वसमभाव राजकारण केले पाहजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दारूगोळा सांभाळणारा अल्पसंख्यक होता. समाजात एकोपा राहील असे काम झाले पाहिजे, असं अजित पवार म्हणाले.

## वीज दरकपातीच्या निर्णयाला नियामक आयोगाकडून स्थगिती

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**मुंबई** - महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीन वीज दर आदेशावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडच्या विनंतीनुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. हा आदेश १ एप्रिल २०२५ पासून नव्या दरकपातीचा निर्णय लागू होणार होता, परंतु त्यामध्ये काही स्पष्ट चुका असल्याचे महावितरणने निदर्शनास आणले आहे. त्यामुळे, आता महावितरणकडून करण्यात आलेल्या दरकपातीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपूर्वी ग्राहकांना मिळालेला आनंद काही क्षणापुरताच राहिला असून त्यांना पुन्हा लाईट बिलाचा शॉक बसलाय, असेच म्हणावे लागेल. महावितरणच्या वकिलांनी सांगितले की, या वीज दर आदेशातील (पान ४ वर)

## मतदार यादीत घोटाळा? ; भाजप आमदार महेश लांडगे यांना न्यायालयाची नोटीस

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**पुणे** - भोसरी विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात मतदार-यादी घोटाळा झाल्याने कायद्याला अपेक्षित मोकळ्या व प्रामाणिक वातावरणात निवडणूक प्रक्रिया झाली नाही, असा आरोप करणाऱ्या निवडणूक याचिकेची दखल घेऊन न्या. आर. आय. छागला यांनी प्राथमिक सुनावणी झाल्यावर आमदार महेश लांडगे यांच्या विरुद्ध नोटीस जारी करून १५ एप्रिलपर्यंत याचिकेतील आरोपांबाबत उत्तर सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

भोसरी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार म्हणून अजित दामोदर गव्हाणे यांनी भाजपच्या महेश लांडगे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. आपल्या बाजूने मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण असताना अचानक महेश लांडगे मताधिक्क्याने निवडून आले. लांडगे यांच्या निवडणूक विजयाला आव्हान देणारी निवडणूक याचिका गव्हाणे यांनी ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रीया आवले, ॲड. राजाभाऊ चौधरी यांच्या मदतीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली. संगनमताने बनावट-खोट्या व्यक्तींची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया व मतमोजणी याबाबत पारदर्शकता न ठेवणे, १७ सी फॉर्म्स, सीसीटीव्ही फुटेज माहिती अधिकारात न देणे आणि माहिती मागण्याचा मूलभूत अधिकार निवडणूक आयोगाने फेटाळणे, एकूण ईव्हीएम मशिन्सच्या ५ टक्के मशिन्समधील मतांचे व्हेरिफिकेशन व्हावे, असे सर्वोच्च न्यायालयाचे २०१३ मधील आदेश न पाळणाऱ्या मार्गदर्शक सूचना केंद्र सरकारच्या सूचनेवरून निवडणूक आयोगाने काढणे हे षड्यंत्र असल्याचा आरोपसुद्धा याचिकेतून करण्यात आला आहे.

## दिशा सालियन प्रकरणाची याचिका दुसऱ्या खंडपीठासमोर चालणार; हायकोर्टाकडून पहिल्याच सुनावणीत विनंती मान्य

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**मुंबई** - दिशा सालियन मृत्यूप्रकरणी दिशाचे वडील सतिश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर हायकोर्टात सुनावणी सुरू झाली आहे. या याचिकेतून सतिश सालियन यांनी दिशाच्या मृत्यूसाठी आदित्य ठाकरे यांना जबाबदार धरत त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यासंदर्भात राशिद खान पठाण यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेसोबत सतिश सालियन यांची फौजदारी रिट याचिका जोडण्याची विनंती हायकोर्टाकडे करण्यात आली आहे. त्यासाठी, दिशाचे वडील सतिश सालियन कोर्टात जातीनं हजर राहिल्याचं दिसून आलं. त्यातच, पहिल्याच दिवशी उच्च न्यायालयात सतिश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांची विनंती उच्च न्यायालयाकडून मान्य करण्यात आली आहे.

आमच्याकडून सुनावणीची पूर्ण तयारी झाली आहे, मात्र उद्या सुनावणीत काही होण्याची शक्यता कमी आहे. कारण, ज्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही सुनावणी होणार आहे, त्यांच्याविरोधातच आमची तक्रार आहे, असे सतिश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी सुनावणीच्याअगोदर पत्रकार परिषद घेऊन म्हटले होते. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांची सख्खी बहीण वंदना चव्हाण सक्रिय (पान ४ वर)

## २५०० किलो अमली पदार्थ जप्त; भारतीय नौदलाची कारवाई

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**पणजी** - भारतीय नौदलाच्या आयएनएस तर्कष या पश्चिम कमांडअंतर्गत कार्यरत आघाडीच्या युद्धनौकेने हिंद महासागराच्या पश्चिम क्षेत्रातील गस्तीदरम्यान २,५०० किलो अंमली पदार्थ जप्त केले. या कारवाईतून भारतीय नौदलाची सागरी गुन्हेगारीविरुद्ध लढण्याची व क्षेत्रिय सुरक्षा बळकट करण्याची अतूट वचनबद्धता अधोरेखित होते. ही या वर्षातील मोठी कार्यवाही आहे.

जानेवारी २०२५ मध्ये सागरी सुरक्षेसाठी हिंद महासागराच्या पश्चिम क्षेत्रात तैनात करण्यात आलेली आयएनएस तर्कष ही युद्धनौका संयुक्त कृती दल १५० या पथकाला सक्रिय मदत करते. हा संयुक्त सागरी सुरक्षा दलाचा एक भाग असून त्याचा तळ बहारिनमध्ये आहे. ही युद्धनौका ॲन्झॅक टायगर या बहुराष्ट्रीय संयुक्त उद्देश लष्करी मोहीमेत सहभागी झाली आहे.

३१ मार्च रोजी गस्तीवर असताना आयएनएस तर्कष युद्धनौकेला पी ८१ या भारतीय नौदलाच्या विमानाकडून त्या भागातील संशयास्पद नौकांची माहिती मिळाली. या नौका अंमली पदार्थांच्या तस्करीसह अन्य बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असल्याची माहिती मिळाल्यानंतर तर्कष युद्धनौकेने आपला मार्ग बदलून संशयास्पद नौकांच्या मार्गात हस्तक्षेप केला.

आसपासच्या सर्व संशयित नौकांची कायदेशीर चौकशी केल्यानंतर मुंबईतील सागरी कारवाई केंद्र आणि पी-८१ विमानाच्या समन्वयाने तर्कषवरील अधिकाऱ्यांनी एका संशयित नौकेवर प्रवेश केला. याशिवाय तर्कषवरील हेलिकॉप्टरद्वारे संशयास्पद नौकांवरील हालचालींवर देखरेख ठेवण्यात आली व त्या भागातील आणखी अशाच संशयास्पद नौकांचा शोध घेण्यात आला.

सागरी कमांडोंसह विशेष पथकाने संशयास्पद नौकेवर दाखल होऊन शोधमोहीम राबवली. यामध्ये विविध बंद पाकिटे आढळली. पुढील तपासात या नौकांमधील वेगवेगळ्या भागांमध्ये, वेगवेगळ्या कप्प्यांत २५०० किलोपेक्षा (पान ४ वर)

## गुजरातने रोखला आरसीबीचा 'विजयरथ'

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**बंगळूर** - जोस बटलर-साई सुदर्शनची धमाकेदार फलंदाजी आणि गोलंदाजांच्या चतुरस्त्र माऱ्याच्या बळावर गुजरात टायटन्सने आयपीएल साखळी सामन्यात आरसीबीचा तब्बल ८ गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासह त्यांनी आरसीबीचा विजयरथही रोखण्याचा पराक्रम गाजवला. प्रारंभी आरसीबीला निर्धारित २० षटकांत ८ बाद १६९ धावांवर रोखल्यानंतर गुजरातने १७.५ षटकांत २ बाद १७० धावांसह दणकेबाज विजय साकारला. विजयासाठी १७० धावांचे आव्हान असताना जोस बटलरने ३९ चेंडूंत ५ चौकार, ६ षटकारांसह नाबाद ७३ धावांची आतषबाजी केली तर सलामीवीर साई सुदर्शनने ३६ चेंडूंत ४९ धावा चोपल्या. कर्णधार शुभमन (१४) स्वस्तात बाद झाला असला तरी बटलरने शेरफेन रुदरफोर्डसह विजयाचे सोपस्कार पूर्ण केले. रुदरफोर्ड १८ चेंडूंत ३० धावांवर नाबाद राहिला.

प्रारंभी, गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आणि आरसीबीला निर्धारित २० षटकांत ८ बाद १६९ धावांवर रोखले. पाचव्या स्थानावरील लियाम लिव्हिंगस्टोनने ४० चेंडूंत सर्वाधिक ५४ धावांचे योगदान दिले तर जितेश शर्माने २१ चेंडूंत ३३ धावा फटकावल्या. या जोडीने पाचव्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी केली. ठरावीक अंतराने गडी बाद होत राहिल्याने याचा आरसीबीला सातत्याने फटका बसत राहिला आणि यामुळे त्यांच्या धावसंख्येवरही मर्यादा येत राहिल्या. फिल सॉल्ट (१४) व विराट क ोहली (७) हे दोन्ही सलामीवीर स्वस्तात बाद झाल्यानंतर तोच कित्ता थोड्याफार फरकाने देवदत्त पडिक्कल (४) व कर्णधार रजत पाटीदार (१२) यांनीही गिरवला. या पडझडीमुळे आरसीबीची पाहता पाहता ६.२ षटकात ४ बाद ४२ अशी दैना उडाली. सॉल्टचा सिराजने त्रिफळा उडवला तर विराटने अर्शदच्या गोलंदाजीवर लाँग लेगवरील प्रसिद्ध कृष्णाकडे सोपा झेल दिला.

# अवकाळी पावसाने शेती पिकांचे आतोनात नुकसान; शेतकरी संकटात

**ग्लोबल भारत न्युज नेटवर्क**

**मुंबई** - राज्यातील अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावलअसून काही ठिकाणी गारांचा पाऊस झाल्याने शेतीचं देखील नुकसान झालं आहे. राज्यात काही भागात पुढचे ५ दिवस हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. आज देखील अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. कोल्हापूर, कराड, जालना, छत्रपती संभाजीनगर, सातारा, या ठिकाणी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. तर अवकाळी पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अवकाळीमुळे आंब्याच्या पिकांचं देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

जालन्यात देखील अवकाळी पावसाचा रब्बी पिकांना फटका बसला आहे. यात काढणीस आलेला गहू आणि मका पिकाचं मोठं नुकसान झालंय. जालन्यातील घनसांवगी तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात सकाळच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने गहू आणि मका पिकाच नुकसान झालं आहे. तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात अवकाळी पावसाने रब्बी हंगामातील मक्का आणि गहू पिकाच मोठा नुकसान झालं आहे. घनसावंगी तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात सकाळच्या सुमारास अवकाळी पाऊस झाला आणि या पावसामुळे गहू आणि मक्का पिकाच मोठ नुकसान झालं. यामुळे काढणीला आलेला गहू आणि मका पीक अवकाळी पावसामुळे आडवं झाल्याचं पाहायला मिळाले.

दरम्यान या बेमोसमी अवकाळी पावसामुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला असून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

मंगळवारी सायंकाळी सांगली जिल्ह्यातील काही भागांत उन्हाळी पावसाने हजेरी लावली. तासगाव तालुक्यातील मणेराजुरी गावात गारपीट झाली असून शिराळा, पलूस, कडेगाव व खानापूर तालुक्यातील काही गावात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. या पावसाने द्राक्ष व बेदाणा उत्पादकांची चिंता वाढली आहे. तसेच, आंब्याच्या बागांनाही फटका बसला आहे.

विदर्भातील अकोला जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालंय. बाळापुर तालुक्यातल्या कांदा आणि केळी उत्पादक शेतकऱ्याला याचा मोठा फटका बसलाय. बाळापुर तालुक्यातल्या तामशी गावात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा फटका बसलाय. काढणी करून कापण्यासाठी ठेवलेला शेतातला कांदा अक्षरशः अवकाळी पावसाच्या पाण्याने भिजला आहे. यात जवळपास हजारो क्विंटल कांद्याचं नुकसान झालं आहे.



सलग पाच दिवस राज्यात ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात राज्यात कमाल तापमान ३५ ते ४२ अंश सेल्सिअस दरम्यान राहील असंही हवामान विभागानं म्हटलं आहे. बाष्पयुक्त वातावरण आणि तापमानवाढीमुळे जास्त उंचीचे ढग निर्माण होत आहेत, त्यामुळे पुढील पाच दिवस अवकाळी पावसाचे वातावरण राहील, असेही हवामान विभागाने म्हटले आहे. (पान ४ वर)

# उजेडाच्या चेहऱ्यावरचा 'तीळ'

गजानन माधव मुक्तिबोध आणि विनोद कुमार शुक्ल हे तसे एकाच गावचे. कादंबरीकार-कथाकार शुक्ल यांचा मूळ पिंड कवी हाच. त्यांच्या कविता प्रकाशित होण्यास निमित्त ठरले मुक्तिबोध. शुक्ल यांनी हिंदी साहित्यविश्वात स्वत:ची एक शैली निर्माण केली आहे. या श्रेष्ठ साहित्यिकाला यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला आहे. यानिमित्त राजनांदगाव. जि. राजनांदगाव, राज्य छत्तीसगड. गजानन माधव मुक्तिबोधांची ही लिखाणभूमी. विनोद कुमार शुक्ल यांची जन्मभूमी-लिखाणभूमी. काही गावांच्या वाट्याला काही व्यक्तींच्याद्धारे अमरत्व येते. हे असेच एक गाव. मुक्तिबोध छत्तीसगडमधील या गावात शिक्षक म्हणून आले. दिग्विजय महाविद्यालयात रुजू झाले. शुक्ल हे गावचेच. त्यांच्या कविता मुक्तिबोधांच्या हाती पडल्या. मुक्तिबोधांनी काही मासिकासाठी पाठविल्या. प्रकाशित झाल्या आणि इथून एक सिलसिला सुरू झाला. आणि शुक्ल यांना यंदाचा 'ज्ञानपीठ' जाहीर झाला. मुक्तिबोधांच्या कवितांत फॅण्टसी आहे. आणि शुक्ल वास्तवापेक्षा कल्पनेवर अधिक विश्वास ठेवतात. ते म्हणतात, 'कल्पनेत एकप्रकारची ताकद आहे. उमेद आहे.' मुक्तिबोधांना शुक्ल हे कसे भेटले, हे त्यांनी सांगितले आहे. या सांगण्यात एक अर्थ आहे. साहित्य अकादमीने त्यांची सातेक महिन्यांपूर्वी एक मुलाखत घेतली होती. या मुलाखतीतील शुक्ल यांची आठवण- 'मुक्तिबोधजी आपल्यासोबत कंदील घेऊन आले होते. कंदिलाचा जमाना होता तो. ते कंदील घेऊन आले तेव्हा, उजाला पहले हिलता डुलता आया, फिर बाद में मुक्तिबोध जी आए. माझ्या मनात ही प्रतिमा अगदी लक्षात राहिली आहे.' लेखनावर एकमेकांचा प्रभाव पडतो, हे शुक्ल यांना ठाऊक आहे. ते लिहू लागले तेव्हा त्यांच्या एका कवितेत भवानी प्रसाद मिश्र यांची एक ओळ आली. चुलत भाऊ रागावला. शुक्ल यांचे मन दुखले. आईशी बोलले. आई म्हणाली, तुझ्या लिखाणाला गाळणी लाव. त्यांना गाळणी लावण्याचे भान आले. हे भान हरपू दिले नाही. परिणाम असा झाला. विनोद कुमार शुक्ल यांनी हिंदी साहित्यविश्वास वेगळी लेखनशैली दिली. ठाशीव ओळख सांगणारी! कविता आणि कादंबरी-कथा लिहिणारी माणसे साहित्यविश्वात तशी कमीच. शुक्ल या यादीत आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतही कविता वाहते आणि कथांतही, असे निरीक्षण आहेच. शुक्ल यांच्या कविता प्रकाशित होण्यास गजानन माधव मुक्तिबोध हे निमित्त ठरले. त्यांच्या प्रारंभीच्या कविता मुक्तिबोधांनी वाचल्या. वाचत राहिले. आवडलेल्या सहा कविता मुक्तिबोधांनी हक्काने 'कृति' या मासिकाकडे पाठविल्या. श्रीकांत वर्मा हे संपादक होते. या कविता प्रकाशित झाल्या. शुक्ल यांच्या कविता पहिल्यांदा प्रकाशित झाल्या. एरवी शुक्ल हे त्यांचे लिखाण प्रकाशित करण्याबाबत कमालीचे निरुत्साही होते, असे अशोक वाजपेयींनी म्हटलेच आहे. 'उजाला पहले हिलता डुलता आया' असे मुक्तिबोधांबाबत शुक्ल म्हणतात, तेव्हा हा उजाला त्यांच्या साहित्यकृतींचा; त्यांच्या कवितांचा अभिप्रेत असावा. नक्कीच! उजेडाचे महत्त्व गडद अंधारामुळे तीव्रपणे अधोरेखित होते. हा अंधार मुक्तिबोधांच्या कवितांत सतत आहे. विविध रूपांत आहे. हा अंधार शुक्ल यांना आकळला असावा. कल्पनेच्या विश्वात तर अंधार महत्त्वाचे कॅरेक्टर. 'डूबता चाँद कब डूबेगा' या कवितेत मुक्तिबोध लिहितात- 'दुर्घटना से ज्वाला काँपी कंदीलों में/ अँधियारे कमरों की मद्धिम पीली लौ में,/ जब नाच रही भीतों पर भुरही छायाएँ/ आशंका की-/ गहरे कहराते गर्भो से/ मृत बालक ये कितने जनमे,/ बीमार समाजों के घर में!' विनोद कुमार शुक्ल यांना मुक्तिबोधांच्या हाती दिसलेला एक तो कंदील, आपल्या हाती आहे, हे मुक्तिबोधही जाणून होतेच. हा कंदील त्यांच्या हाती होता. तसा मनातही होता. अवतीभवतीही दिसत होता. 'झरने के पथरीले तट पर/ रात के अँधेरे में घीरे/ चुपचाप, कौन वह आता है, या आती है,/ उनके पीछे-/ पीला पीला मद्धिम कोई कंदील' असे मुक्तिबोध यांनी कवितेत लिहिले आहे. 'डूबता चांद कब डूबेगा' या कवितेत ते म्हणतात, 'अँधियारे मैदान के इन सुनसानों में/ बिल्ली की, बाघों की आँखों-सी चमक रहीं/ ये राग-द्वेष, ईर्ष्या, भय, मत्सर की आँखें' मुक्तिबोधांच्या कवितेत अंधार नानाविध भूमिकांत, वेगवेगळ्या व्यक्तिरेखा म्हणून आला आहे. 'चकमक की चिनगारियाँ' या कवितेत हवा 'अँधेरी आत्म-संवादी' आहे. 'अँधेरी निम्न-कक्षा' आहेत. 'अँधेरी भीतरी गोलाइयां' आहेत. एक अंधारी मीनार आहे. 'पुराने रोशनी-घर के अँधेरे शून्य-टॉवर' आहेत. 'चाँद का मुँह टेढ़ा है' या कवितेत 'नगर के बीचो-बीच/ आधी रात-अँधेरे की काली स्याह' आहे. अर्ध्या रात्री अंधार काळाकुट्ट आहे. 'अंधाराच्या पोटातून ज्वाळांचे आतडे बाहेर निघतात तसे' असाही एक विचार आहे. 'रात्रीचे अंधारे वास्तव' आहे. या कवितेत अंधार 'अँधियाला' आहे. 'और, उस अँधियाले ताल के उस पार/ नगर निहारता-सा खड़ा है पहाड़ एक' 'अँधेरे में' या कवितेत 'गलियों के अँधेरे में' खूप काही आहे. यात अस्वस्थता अधिक आहे. अंधार दिसायला साधा असला तरी तो आपल्या पोटात अनेक रहस्य घेऊन दाराआड लपलेला असतो. उरात अनेक गोष्टी दडवून ठेवतो. त्या शोधण्याचा अट्टाहास चालत नाही. त्याच्याशी एक तर उभा झगडा मांडावा लागतो, नाही तर त्याच्याशी जुळवून घ्यावे लागते. हे असे केले की अंधाराकडून गडद काही बाहेर काढता येते. ते करताना आपल्या हाताच्या तळव्यावर अंधारकाजवा येऊन बसतो. अंधाराआडचा उजेड असा वाढत जातो. विनोद कुमार शुक्ल हेदेखील अंधाराला वगळू शकले नाहीत. अंधार सोबत असतोच. कधी कधी पिच्छाच पुरवतो. शुक्ल हे त्यांच्या 'आँख बंद कर लेने से' या कवितेत लिहितात- 'अँधेरे में बड़े सवेरे एक खग्रास सूर्य उदय होता है/ और अँधेरे में एक गहरा अँधेरे में एक गहरा अँधेरा फैल जाता है' 'कोणत्या अंधाऱ्या शिंक्यात टांगून ठेवलेले आहे, कोणत्या नक्षत्राचा अंधार' असा प्रश्न ते करतात; नव्हे, हा प्रश्न त्यांना पडतो. 'रायपुर बिलासपुर संभाग' या कवितेत ते लिहितात- 'अँधेरे अधर में लहर गई एक हरी बत्ती/ किसी ख़ूँख़ार जानवर की अकेली आँख अँधेरे में हरी चमकी' मुक्तिबोधांच्या कवितेत मांजर, वाघांचे अंधारात चमकणारे डोळे आहेत. शुक्ल यांच्या कवितेत कुण्या भीतीदायक प्राण्याचा चमकणारा एक डोळा. अंधार दोघांनीही पाहिला आहे. अंधारात प्राण्यांच्या चमकणाऱ्या डोळ्यांचा अर्थ दोहेही जाणून आहेत. तसे दोघेही एकाच 'गाव'चे आहेत. 'अंधाराच्या मैदानात अंधाराचे आभाळ होते. त्यात हे गाव होते. मातीची घरे होती. कुठे कुठे शेत होते. या अंधारात जर वरून स्वर्ग उतरणार असल तर, तो स्वर्गही तसाच होऊन जाईल; इथल्या नरकासारखा!' असे शुक्ल लिहून जातात. मुक्तिबोधांचे अंधार भरले मैदान शुक्ल यांनाही दिसते. ते लपून कसे राहणार? 'अंधारच सर्वकाही होता. त्यात काहीच दिसत नव्हते. सारे झाकून राहत होते', असे शुक्ल हे अंधाराच्या आडचे सांगू पाहतात. गोष्ट झाकपाकीची निघाली आहे तर, शुक्ल यांच्या या ओळी- 'जितके वाईटपण आहे, ते यासाठी की, काही गोष्टी लपविल्या जात नाहीत आणि चांगुलपणा यासाठी की, काही गोष्टी लपवूनच ठेवलेल्या असतात.'

# समाजात पदाची मिजास कशासाठी?

संविधान निर्मात्यांनी ओबीसींसाठी संविधानात तरतूद केलेली आहे त्याचा योग्य उपयोग सर्वच ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाज जागृतीसाठी करावा.लाखोंच्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा गवगवा करणाऱ्या अनेक सामाजिक संघटना,संस्था फक्त कागदोपत्री मात्र असतील आणि राज्यभरात यांचे तालुका पातळी ते राज्यपातळीवर हजारो पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असेल यापैकी अनेक जण स्वतः लाच समाजाचे नेतृत्व म्हणवून घेत असतील परंतु,कोणाच्याही नेतृत्वाखाली यांच्याच स्वतःच्या हक्काच्या जिल्ह्यात ठोस विधायक कार्यक्रम आयोजित केले जात नाहीत.उद्योग व्यवसाय उभारणी करून हजारो तळागाळातील उपेक्षित कष्टकरी आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना तसेच गरजू महिलांना आर्थिक उत्पनाचे साधन संसाधन म्हणून रोजगार निर्मिती केलेली नसून ओबीसी,आरक्षण संदर्भात समाज जागृती मेळाव्यात हजारोंच्या,लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करण्या इतपत यांची समाजात सामाजिक पत, समाजात प्रभाव,प्रभुत्व,प्राबल्य त्या तोडीचा दबदबा निर्माण करता आलेला नाही मग सुतार समाजात पदाची मिजास कशासाठी?

ओबीसी सुतार समाजात मोठ्या आवेशात नेतेगिरी करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी आणि जबाबदार पदाधिकाऱ्यांनी समाजात उद्योग व्यवसाय,ओबीसी,आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात सुतार समाजात समाज जागृती निर्माण करण्यासाठी अजिबात प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृत झाला तर या लोकांना उजळमाथ्याने मोठेपणा मिरवता येणार त्यासाठी बुद्धिवान लोकांनी जागरूक असावे जेणेकरून ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करण्यास कोणताही पुढारी धजावणार नाहीत.समाजात फक्त विशिष्ट लोकांचे वाढदिवस,सदिच्छा भेटीगाठीचे,आनंदाच्या क्षणांचे औचित्य साधून मात्र सोशल मीडियावर फोटोबाजी करून त्याखाली न विसरता ठळकपणे आवर्जून संबंधित पदांचा उल्लेख केला जातो अशाच पद्धतीने समाजात स्वयंघोषित पुढारी उदयास येतात हिच सत्य परिस्थिती आहे.

ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात जिल्हा सोडा राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात फक्त दहा,पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना आपल्या कर्तबगार कर्तृत्ववान कार्यसम्राट धडाकेबाज नेतृत्वाखाली एकत्र करू शकत नसतील तर मग राज्यात ना एक नंबरवर कोणी ना समाजात समाज नेता ना समाज नेतृत्व कोणी ना धडाकेबाज युवक नेतृत्व कोणी ओबीसी सुतार समाजात ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यातील कोणत्याही एकाच जिल्ह्यातील फक्त पाच ते सहा हजार तालुक्यातीलच दहा हजार ओबीसी सुतार समाज बांधव एकत्र येऊ शकतात बाकीचे शिल्लक तालुके आणि उरलेले ३५ जिल्हे हिशेबात सुद्धा धरू नका कारण भौगोलिक क्षेत्र कमी असलेल्या जिल्ह्यात सुद्धा समाजाची लोकसंख्या तीस ते चाळीस हजारा पर्यंत असेल.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील जबाबदार पदाधिकारी आणि सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी समाज चिंतन करण्याची नितांत गरज आहे.समाजात फक्त नावासोबत सामाजिक पदभार जोडण्यासाठी नसतो हे आपण सर्वच मान्यवर जाणतो.सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित समजणारे सामाजिक पद आणि पदानुसार समाज प्रतिष्ठा पदाच्या उंचीनुसार हक्काचे ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्र करण्याची समाजात क्षमता,पात्रता,प्रतिष्ठा ओबीसी सुतार समाजात समाज किंमत, प्रभाव,प्राबल्य,प्रभुत्व,समाजात प्रचंड समाजप्रिय असलेले,समाज अभ्यासक,थोर विचारवंत आणि कृतीशील,कार्यसम्राट,सुतार सम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान सामाजिक कार्यात तत्परता इत्यादी तर ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात सामाजिक वैचारिक तसेच नैतिकतेच्या आधारावर ओबीसी सुतार समाजात एकही बहाद्दर सामाजिक ते राजकीय पदाधिकारी सापडणार नाही हि ओबीसी सुतार समाजात सत्य परिस्थिती आहे.

ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील सर्वच सन्माननीय जबाबदार पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली मग ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील पद तालुका पातळीवर असो अथवा जिल्हा पातळीवर असो किंवा,राज्य पातळीवर असो असावे फक्त नावासोबत पदभार,पदावली,एखाद्या पदाची नैतिक जबाबदारी स्वीकारलेली असेल अशा सर्वच बुद्धिवान कर्तृत्ववान प्रत्येक जबाबदार सन्माननीय पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली त्या त्या क्षेत्रातील त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील ओबीसी सुतार समाज बांधवांना दरडोई किमान दहा ते पंधरा हजार तरी ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्यात,आरक्षण,संविधान जागरूकता अभियान कार्यक्रमात,ओबीसी समाज आंदोलनात,ओबीसी मोर्चात किंवा,इतर अन्य ओबीसी संदर्भात सुतार समाज प्रबोधनात्मक ,समाज आंदोलनात्मक कार्यक्रमात संबंधित नेतृत्वाखाली दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करावं यासाठी धाडस करावं.

याबाबतीत ओबीसी सुतार समाजातील सर्वच सामाजिक संघटना आणि संबंधित सामाजिक संस्थेच्या अधिकारात सूचना,प्रसिद्धी पत्रक,पत्रकार परिषदेत,सर्वच सोशल मीडियावर आवाहन करण्यात आले तर वरीलपैकी किती जबाबदार पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करण्यात यशस्वी होतील जर समजा यशस्वी नाही झाले अयशस्वी ठरले तर सामाजिक वैचारिक व नैतिकतेच्या आधारावर त्या त्या पदावर पदाला चिकटून राहण्याचा नैतिक अधिकार शिल्लक राहतो काय याचा मात्र विचार करण्याची गरज आहे.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील संघटना,संस्था आणि पदांची निर्मिती,पदभार कशासाठी असतो आणि जबाबदार कार्यकारिणी कशासाठी अस्तित्वात असते.आपला विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे हे तर आपण चांगल्या प्रकारे जाणतो कारण आपण विविध क्षेत्रातील फॉर्मवर कॉलम मध्ये ओबीसी कॅटेगरीचा उल्लेख करतो.

विश्वकर्मीय सुतार समाजात ओबीसी बद्दल,सत्ता संपत्ती ज्ञान,संवैधानिक अधिकार, आरक्षण,जनगणना,राजकीय हिस्सेदारी,भावी पिढीला ओबीसी बद्दल व इतर विषयांवर माहिति होण्यासाठी ओबीसी सुतार समाजात समाज प्रबोधन, समाज जागृती निर्माण करण्याची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी कोणाची यावर चिंतन मनन,विचार मंथन,समाज चिंतन करणे गरजेचे आहे.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात अनेक सामाजिक संघटना अस्तित्वात आहेत आणि अनेक सामाजिक संस्था सुद्धा कार्यरत आहेत आणि संबंधित सामाजिक पदाधिकारी मान्यवरांची कागदोपत्री का होईना नियुक्ती मात्र राज्यभरात आवर्जून केलेली असेलच त्या शिवाय नावासोबत पदाचा उल्लेख केला जाणारच नाही.एवढा मोठा प्रचंड ओबीसी सुतार समाज ताफा,राज्यातील जबाबदार पदाधिकाऱ्यांची प्रचंड शक्ती,पाठबळ सामाजिक संघटनांकडे कार्यरत असतांना ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात पिछाडीवर कशासाठी हा प्रश्न मात्र समाजात अनुत्तरित आहे. ओबीसी सुतार समाज सुशिक्षित,उच्चशिक्षित आहे याची कल्पना सर्वानाच आहे शिवाय अनेक समाज मान्यवर समाजात समाज प्रतिष्ठित असतील अनेक मान्यवरांनी नावासोबत समाज नेता,समाज नेतृत्व,युवक नेतृत्व अशी सन्मानित पदाची बिरुदावली सुद्धा जोडण्यात आलेली असेलच.याव्यतिरिक्त समाजात समाजाची शान,बाण,आण आणि दिग्गज,धुरंधर,बुलुंद तोफ,बुलुंद आवाज तसेच कार्यसम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान,तडफदार,धडाकेबाज,विचारवंत,मार्गदर्शक, आधारस्तंभ असणारे सुद्धा ओबीसी सुतार समाजात नक्कीच असतील.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज प्रभाव,प्रभूत्व,प्राबल्य, समाजात समाजप्रिय सुद्धा असतील समाजात वैयक्तिक पातळीवर कोण किती आर्थिक परिस्थितीने गर्भश्रीमंत,धनवान, धनाढ्य, प्रतिष्ठित,प्रतिभावंत आहेत याचा संबंध अजिबात येत नाही.समाजात सामाजिक श्रीमंती आणि वैयक्तिक श्रीमंती हे दोन्हीही विषय वेगवेगळे आहेत हे लक्षात घेणे गरजेचे असते. ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात वरीलप्रमाणे सर्वच समाज नेतृत्वाखाली,सर्वच पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी समाज जागृती मेळाव्यात,आंदोलन ठिकाणी, ओबीसी मोर्चात समाजात सहभागी करणे गरजेचेच आहे. अन्यथा ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील सन्माननीय पदाची मिजास कशासाठी निदान यावर विचार तर कराल सध्या राज्यात आणि देशातील सर्वच ओबीसी संघटना ओबीसी संस्था, आणि ओबीसी पदाधिकारी, ओबीसी नेतेमंडळी ओबीसी बद्दल समाज जागृती,जनजागृती करण्याचा प्रयत्न करतात कारण ओबीसींचे संवैधानिक हक्क, आणि अधिकार अबाधित राहावे यासाठी.मग अशा वेळी आपला ओबीसी सुतार समाज ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असूनही ओबीसी बद्दल समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात पिछाडीवर कशासाठी यावर विचार मंथन,समाज चिंतन, आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करणे ओबीसी समाज जागृती संदर्भात विविध ठिकाणी विविध कार्यक्रमात सामाजिक वैचारिक आणि नैतिकतेच्या आधारवर संबंधित जबाबदार नेत्यांनी आणि जबाबदार पदाधिकाऱ्यांनी विचार मंथन,समाज चिंतन करण्याची नितांत गरज आहे.

पदाधिकारी बुद्धिवान असतात जास्त लिखाण करण्याची गरज नाही.समाजात पदाची मिजास कशासाठी विचार तर कराल.सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने सामाजिक विचार मंथन करणे गरजेचे आहे.समाजात नेतेगिरी करणारे आणि संघटना अध्यक्ष मान्यवरांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यात ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात येईल काय?आणि लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करणार आहात काय?यावर तर्कशुद्ध पध्दतीने मुख्य मुद्द्यावर न बोलता सोयीनुसार पळवाटा शोधणे अवश्य टाळावे आणि समाजाला सत्य परिस्थिती पारदर्शकपणे आपापल्या संघटनेच्या वतीने जाहीर करावी. ओबीसी सुतार समाजात असे किती समाज मान्यवर खऱ्या समाज कसोटीवर उतरतील. सामाजिक, वैचारिक,नैतिक जबाबदारीचा विचार करता हे शिवधनुष्य पेलणे जमत नसेल तर मग एकच प्रश्न अनुत्तरित राहतो कि,ओबीसी सुतार समाजात पदाची मिजास हवी कशासाठी?

**– प्रमोद सूर्यवंशी**

# किल्ले रायगडवर चित्रित झालेल्या पोरी आम्ही मराठी पोरीला लाभतोय उदंड प्रतिसाद

सध्या चर्चेत असलेल्या सस्पेन्स थ्रिलर मराठी चित्रपट शातिर चे दमदार गीत गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. महाराष्ट्राचे तीर्थस्थान असलेल्या किल्ले रायगडावर तब्बल २०० कलाकारांच्या सहभागाने या भव्य गीताचे चित्रीकरण करण्यात आले आहे. सावित्रीच्या लेकी आम्ही, शिवबाच्या तलवारी, पोरी आम्ही मराठी पोरी... असे बोल असलेल्या या दमदार मराठमोळ्या गाण्याला समाज माध्यमांमधून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या गीतामधून मराठी महिलांच्या कर्तृत्वाची गाथा आणि त्यापासून मराठी पोरींना मिळणारी प्रेरणा दर्शविण्यात आली आहे. वैभव देशमुख या चित्रपटाचे गीतकार असून रोहित नागभिडे यांचे संगीत आहे. विख्यात गायिका वैशाली सामंत यांनी या गाण्यांना स्वरसाज चढविला आहे.

शातिर THE BEGINNING या चित्रपटाची निर्मिती श्रीयांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्स या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी केली असून या चित्रपटाद्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. पटकथा सुनील वायकर आणि हेमंत एदलाबादकर यांची आहे.

या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून त्यांच्यासह मीर सरवर, योगेश सोमण, रमेश परदेशी, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, श्रेया कुलकर्णी, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी हे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. येत्या ९ मे २०२५ रोजी शातिर THE BEGINNING हा मराठी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.



# अवकारीका चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित

अशा टॅगलाईनसह आलेल्या अवकारीका चित्रपटाच्या पोस्टरमध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्यासमोर हातात झाडू घेऊन एक स्वच्छता दूत अगतिकपणे उभा असल्याचे दिसतंय. रेडबड मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत येत्या १३ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शन अरविंद भोसले यांचे आहे. या चित्रपटाची निर्मिती भारत टिळेकर यांनी केली असून सहनिर्मिती मनोज गायकवाड, अरविंद भोसले, मृणाल कानडे, गीता सिंग यांची आहे.

स्वच्छतेच्या माध्यमातून स्वतःच्या जगण्याचा रस्ता शोधणाऱ्या वेदनेचा हा शोध असला तरी समाजाला त्यांच्या श्रमाची जाणीव व्हावी, स्वच्छतेची प्रभावीपणे जागरूकता निर्माण व्हावी याच संकल्पनेतून आणि भावनेतून अवकारीका' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

अभिनेता विराट मडके अवकारीका चित्रपटात स्वच्छता दूताच्या भूमिकेत दिसणार असून त्याच्यासोबत या चित्रपटात राहुल फलटणकर, रोहित पवार, विनोद खुरंगळे, पिया कोसुम्बकर, नितीन लोंढे, प्रफुल्ल कांबळे, स्नेहा बालपांडे तसेच बालकलाकार वैभवी कुटे, उन्नती माने, कार्तिकी बट्टे, आदि कलाकार मंडळी दिसणार आहेत. या चित्रपटाची कथा-पटकथा, संवाद, गीते अरविंद भोसले यांची आहेत. छायांकन करण तांदळे तर संकलन अथर्व मुळे यांचे आहे. सहदिग्दर्शक रेहमान पठाण तर कार्यकारी निर्माता चेतन परदेशी आहेत. संगीत श्रेयस देशपांडे यांचे असून गायक कैलास खैर, सुनिधी चौहान, ज्ञानेश्वर मेश्राम यांचे स्वर चित्रपटातील गीतांना लाभले आहेत.




**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनंवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक - शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा ‘ग्लोबल भारत’







मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com

# आपला विस्तार करत असताना, फ़िनेस्टाची नवीन शोरुम आता साताऱ्यात फ़िनेस्टाचा प्रिमियम दर्जाचा खिडक्या आणि दरवाजे आता महाराष्ट्रात

सातारा दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- फ़िनेस्टा भारतातील खिडक्या आणि दरवाजांकरिताचा एक विश्वसनीय आणि अग्रगण्य ब्रॅन्ड आहे, जो आता महाराष्ट्रातील साताऱ्यामध्ये आपली नवीन शोरूम घेऊन आला आहे. शोरूमचे कार्य, द बाथ स्टुडियो एलएलपीद्वारे कार्यरत केले जाणार असून, ते ३१३/६, प्लॉट क्र.३, महाराणा प्रताप चौक, न्यु राधिका रोड, बसप्पा पेठ , सातारा- ४१५२०२ येथे स्थित आहे.

सातारा शहरीकरणाकडे आपली पाऊले झपाट्याने टाकत असताना, प्रिमियम होम सोल्युशन्सची मागणी वाढते आहे आणि म्हणूनच फ़िनेस्टाचा नवीन शोरूमचा माध्यमाने ग्राहकांना एक उच्च-गुणवत्ता आणि व्यापक श्रेणी असलेल्या ॲल्युमिनियम आणि चा खिडक्या आणि दरवाजे तसेच सॉलिड पॅनल डोअर उपलब्ध होणार आहेत. शोरूममध्ये प्रदीर्घ अनुभवाने तयार केलेल्या वस्तू उपलब्ध असतील ज्यामुळे घर मालक, आर्किटेक्ट्स आणि बिल्डर्सला लेटेस्ट आणि आधुनिक अशा खिडक्यांचे तंत्रज्ञान बघायला मिळणार आहे.

शोरूमचा लॉन्चचा निमित्ताने बोलताना, फ़िनेस्टाचे व्यावसायिक प्रमुख असलेले, श्री. साकेत जैन म्हणाले, ‘‘ साताऱ्याचा जलदगतीने होणारा विकासामुळे, उच्च-गुणवत्ता असलेल्या वस्तूंची मागणी आणि नजरेमध्ये भरणाऱ्या आधुनिक खिडक्यांचा तंत्रज्ञानाची मागणी वाढते आहे. या नव्या शोरूमची रचना ही ग्राहकांना उत्तम अनुभव देण्याकरता तयार केली गेली असून ग्राहकांना यामुळे विविध उत्पादनांची श्रेणी, तसेच त्यांचे आधुनिक फ़ायदे माहिती करून मग योग्य निर्णय घेण्यास नक्कीच मदत करेल. फ़िनेस्टा येथे, आमचे लक्ष्य हे टिकाऊ, सौदर्यपूर्ण आणि परिणामकारक अशा उपाय योजना देण्याचे असून भारतीय बाजारपेठेचा निर्माण क्षेत्रामधील विकासाशी मेळ खाणारी उत्पादने आम्ही देण्याचा प्रयत्न करणार आहोत.’’

देशातील आपल्या व्यापक अशा अस्तित्वासह, फ़िनेस्टा कल्पकता, विश्वसनीयता आणि ग्राहक अनुभवासाठी सातत्यने आपली प्रतिमा ऊंचाविण्याचा प्रयत्न करते आहे. सातारा येथील शोरूम ही कंपनीची जागतिक दर्जाच्या खिडक्या आणि दरवाजे सहज उपलब्ध होण्याप्रती असलेली बांधिलकी असून, यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना उत्तम मार्गदर्शन आणि अविरत सेवा मिळण्याची हमी आहे.

फ़िनेस्टा ही भारतातील एकमेव कंपनी आहे जी संपूर्ण सपलाय चेन नियंत्रित करते, मग यूपीव्हीसी बनविण्यापासून, त्याचा इन्स्टॉलेशन पर्यंत तसेच अगदी विक्री नंतरची सेवा देखील प्रदान केली जाते. उत्पादनांना देखील कडक अशा चाचण्या आणि गुणवत्ता तपासण्यांमधून जावे लागते ज्यामुळे भारतातील वैविध्यपूर्ण आणि तीव्र वातावरणामध्ये त्यांचा टिकाव लागू शकेल. या खिडक्या आणि दरवाज्यांची रचना ही विविध वातावरणाचा परिस्थितीत टिकून राहाण्याकरता केली गेली असून बिल्डर्स, आर्किटेक्ट्स आणि इंटिरियर डिझायनर त्यांचा प्रॉपर्टीला आवाज, पाऊस आणि धूळीपासून वाचविण्याकरता खात्रीशीर पद्धतीने त्यांचा वापर करतात.



३५० पेक्षा अधिक भारतातील शोरूम्सचा वाढत्या व्यापासह फ़िनेस्टा आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत देखील उपलब्ध आहे, फ़िनेस्टा अपाल्या क्षेत्रात उत्पादन कल्पकता आणि सेवेचा उत्तमतेसह आपला ठसा उमटविते आहे. मेट्रो शहरांमधील आपल्या अस्तित्वासह, फ़िनेस्टा कल्पकता, विश्वसनीयता आणि ग्राहक अनुभवामुळे होऊ घातलेल्या बाजारपेठांमध्ये देखील आपली छाप निर्माण करते आहे. साताऱ्याची शोरूम हे एक पुढचे पाऊल असून या रणनितीमुळे जागतिक दर्जाचा खिडक्या आणि दरवाजे शहरी ग्राहकांपर्यंत आणून त्यांना सहजता,उत्तमता आणि असिमीत सेवेचा अनुभव देण्याचा कंपनीचा मानस आहे.

## एडलवाइज लाइफ सीडीओ : सँडविच पिढीतील महिलांनी आर्थिक साक्षरतेला प्राधान्य दिलेच पाहिजे

मुंबई दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सँडविच पिढीतील महिलांनी आर्थिक साक्षरता तसेच त्यांच्या आर्थिक नियोजनाचे नियंत्रण स्वतःच्या हाती घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे एडलवाइज लाइफचे चीफ डिस्ट्रिब्यूशन ऑफिसर अनुप सेठ म्हणाले. या संदर्भातील एक अहवाल कंपनीतर्फे अलीकडेच प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार, या पिढीतील ५०% महिलांना आर्थिक गुंतवणुकीच्या साधनांबद्दल असलेली अपुरी माहिती, हे संपत्तीनिर्मिती करण्यामागील एक आव्हान असल्याचे दिसून आले आहे.

सँडविच पिढी म्हणजे ३५ ते ५४ या वयोगटातील पिढी. या वयोगटातील व्यक्तींवर वृद्ध पालक आणि वाढत्या वयातील मुले या दोघांची जबाबदारी असते.

‘‘महिला पूर्वीपासूनच त्यांच्या घराच्या सीएफओ होत्या. दैनंदिन आर्थिक नियोजन त्याच करत असत. असे असूनही दीर्घकालीन आर्थिक नियोजनाची जबाबादारी मात्र त्यांचे वडील किंवा पतीवरच असे. ती स्त्री कितीही शिक्षित असेल किंवा कोणत्याही भागात राहत असेल तरी सगळीकडे साधारण अशीच परिस्थिती होती. आर्थिक नियोजनातील सहभागामध्ये सुधारणा झाली असली तरी अधिकाधिक महिलांनी त्यांच्या आर्थिक भविष्याचे नियंत्रण स्वतःच्या हाती ठेवण्याच्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे, असे आम्हाला वाटते. याची सुरुवात शिक्षणापासून होते.‘‘, असे सेठ म्हणाले.

युगो सहकार्याने करण्यात आलेल्या या अभ्यासात असेही दिसून आले की, या पिढीतील निम्म्याहून अधिक महिलांना वाटते की त्यांच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यात त्या मागे पडत आहेत. कुटुंब हे त्यांचे प्राधान्य असले तरी, या महिलांच्या महत्त्वाकांक्षांमधून त्यांची वैयक्तिक ओळख दिसून येते. या महिलांपैकी अनेक जणी आपली जीवनशैली उंचावू इच्छितात, मुलांच्या लग्नासाठी निधी उभारू इच्छितात, प्रवास करायचा आहे, स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे किंवा मुलांच्या उच्च शिक्षणासाठी गुंतवणूक करायची असते.

‘‘महिलांच्या आकांक्षा या त्यांच्या आर्थिक क्षेत्रातील सक्रिय सहभागासोबतच बदलत गेल्या आहेत. आज अधिकाधिक महिला नेतृत्वस्थानी आहेत आणि त्यांच्या सहभागाचा वेग वाढावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सध्या सुमारे १८% भारतीय स्टार्टअप्स महिला नेतृत्वाखाली चालविले जात आहेत आणि औपचारिक कर्जव्यवस्थेचा लाभ मिळवणाऱ्या महिलांची संख्याही सतत वाढत आहे. सरकारी उपक्रम या संपूर्ण इकोसिस्टमला बळकटी देण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत. महिलांची महत्त्वाकांक्षा आणि निर्णयक्षमता वाढत असताना त्यांच्या आकांक्षांमध्ये अधिक सखोल बदल होताना दिसून येतील. यासाठी आर्थिक साक्षरता अत्यंत आवश्यक ठरणार आहे, जी त्यांना त्यांच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीने सक्षम बनवेल,‘‘ असे सेठ यांनी सांगितले. या अभ्यासातून हेही स्पष्ट झाले आहे की आर्थिक साक्षरतेच्या अभावामुळे महिलांच्या संपत्ती निर्माण करण्याच्या प्रवासावर परिणाम होत आहे. तब्बल ३८% महिलांनी योग्य वेळेपूर्वीच आपले म्युच्युअल फंड्स विकले, ३२% महिलांनी शेअर्समधून लवकर बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, तर ३१% महिलांनी आपले जीवनविमा पॉलिसी मोडल्या.

# व्हायट्रिस सलग चौथ्या वर्षी भारतातील ग्रेट प्लेस टू वर्क म्हणून प्रमाणित

मुंबई दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मायलन लॅबोरेटरीज लिमिटेडला सलग चौथ्या वर्षी भारतातील ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्र प्राप्त होऊन मान्यता मिळाली आहे. ही मान्यता सर्वसमावेशकता, प्रतिबद्धता आणि कर्मचार्यांच्या कल्याणाची संस्कृती वाढविण्यासाठी ची अविचल वचनबद्धता अधोरेखित करते.

बाजार-प्रणीत महसूल, कर्मचार्यांची धारणा आणि वाढीव नाविन्यपूर्णतेसाठी सिद्ध झालेले ग्रेट प्लेस टू वर्क हे कामाच्या ठिकाणी संस्कृती, कर्मचार्यांचा अनुभव आणि केलेले नेतृत्व वर्तन या क्षेत्रातील जागतिक अधिकारी आहे. मूल्यांकनाचा एक भाग म्हणून, ग्रेट प्लेस टू वर्क इन्स्टिट्यूटने ग्रेट प्लेस टू वर्क ट्रस्ट इंडेक्स● कर्मचारी सर्वेक्षणाचा वापर करुन व्हायट्रिस इंडियामधील सहकार्यांचा दृष्टिकोन समजून घेतला. आणी परिणामातच उत्तर दडलेले आहे - सर्वेक्षणाचा भाग असलेल्या ८५% व्हायट्रिस इंडियामधील सहकार्यांनी सांगितले की व्हायट्रिस इंडिया काम करण्यासाठी उत्तम ठिकाण असल्याचे त्यांना वाटते!

ग्रेट प्लेस टू वर्क येथील ग्लोबल रेकग्निशनच्या उपाध्यक्ष सारा ल्युइस-कुलीन म्हणतात, ‘‘ग्रेट प्लेस टू वर्क ही एक अत्यंत प्रतिष्ठित उपलब्धी आहे ज्यासाठी कर्मचार्यांच्या एकूण अनुभवासाठी सातत्यपूर्ण आणि हेतुपुरस्सर समर्पण आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र म्हणजे आपल्या कंपनीच्या संस्कृतीचा कर्मचार्यांबी दिलेल्या सत्य आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अभिप्रायावर आधारित प्राप्त एकमेव अधिकृत मान्यता आहे यावर त्या भर देतात. ‘‘ही मान्यता यशस्वीरीत्या प्राप्त केल्याने हे स्पष्ट होते की आपल्या कर्मचार्यांना कामाच्या ठिकाणी उत्तम वातावरण प्रदान करणार्या कंपन्यांपैकी एक शीर्ष कंपनी आहे.‘‘

अनुपम भट, ह्युमन रिलेशन्स प्रमुख, व्हायट्रिस इंडिया म्हणतात, ‘‘ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्र सलग चौथ्या वर्षी प्राप्त होणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. आमचे लोक-प्रथम तत्त्व आणि जिथे कर्मचार्यांना स्वतःला मूल्य असल्याचे वाटते, सबल आणि करियरच्या प्रगतीसाठी आश्वासक वाटते अशी वातावरणनिर्मिती करण्यासाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांचे थेट प्रतिबिंब म्हणजे हा मैलाचा दगड आहे. व्हायट्रिस मध्ये, आमच्या कर्मचार्यांची भरभराट होण्यास मदत म्हणून आम्ही कल्याण, समावेशकता आणि विकास यामध्ये सातत्याने प्रयत्न करत गुंतवणूक करत असतो. ही मान्यता आमच्याकडे समर्पित टीमचा एक पुरावा आहे आणि कर्मचार्यांना कामाच्या ठिकाणी अनुभव अधिक चांगला करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकट करते.’’

## आयडीएफसी फर्स्ट बँक ही पेन्शन वितरणासाठी भारत सरकारच्या सेंट्रल पेन्शन अकाउंटिंग ऑफिसकडून अधिकृत

मुंबई दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज जाहीर केले की त्यांना भारत सरकारच्या सेंट्रल पेन्शन अकाउंटिंग ऑफिस (सीपीएओ) ने त्यांच्या वतीने पेन्शन वितरित करण्यास अधिकृत केले आहे. यामुळे बँकेला अखिल भारतीय सेवा अधिकारी, माजी संसद सदस्य, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश, भारताचे माजी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती आणि नागरी मंत्रालये आणि विभागांचे अधिकारी (रेल्वे, टपाल, दूरसंचार आणि संरक्षण वगळता) यांचा समावेश असलेल्या केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनधारकांना पेन्शन वितरित करण्याची परवानगी मिळते. पेन्शनधारकांना आता त्यांचे पेन्शन थेट त्यांच्या आयडीएफसी फर्स्ट बँक बचत खात्यात मिळू शकते. तांत्रिक दृष्टिकोनातून, सीपीएओ, भारत सरकार आणि आयडीएफसी फर्स्ट बँक यांच्यातील एकात्मता पूर्ण झाली आहे आणि अशा पेन्शन वितरणासाठी तयार आहे.

पेन्शनधारक पेन्शन मिळविण्यासाठी त्यांच्या जोडीदारासोबत संयुक्तपणे आयडीएफसी फर्स्ट बँक बचत खाते देखील उघडू शकतात. प्राथमिक पेन्शनधारकाचा मृत्यू झाल्यास, जोडीदाराला त्याच खात्यात कुटुंब पेन्शन मिळत राहू शकते.

## भारतातील सर्वात मोठ्या ७३००एमएएच बॅटरीसह ११ एप्रिल रोजी आईकू जेड लाँच

पुणे दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ११ एप्रिल २०२५ रोजी भारतात आईकू जेड १० मालिका लाँच करण्यासाठी सज्ज आहे. प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुणांना लक्ष्य करून, आईकू जेड १० हा भारतातील पहिला आणि सर्वात मोठा स्मार्टफोन आहे ज्यामध्ये ७३०० एमएएच बॅटरी आहे जी दीर्घकाळ वापरल्यानंतरही दोन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकू शकते. हा भारतातील सर्वात पातळ ७३०० एमएएच बॅटरी असलेला स्मार्टफोन आहे ज्याची जाडी फक्त ०.७८९ सेमी आहे. शैक्षणिक, सामाजिक जीवन आणि इतर क्रियाकलापांमध्ये संतुलन राखू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. स्नॅपड्रॅगन ७एस जेन ३ प्रोसेसरने सुसज्ज, आयक्यूओ झेड त्याच्या ८.२ लाख+ अँटू टू बेंचमार्क स्कोअरसह उत्कृष्ट कामगिरी करतो. यात या सेगमेंटमधील सर्वात तेजस्वी क्वाड वक्र एमोलेड डिस्प्ले आहे ज्याचा स्थानिक पीक ब्राइटनेस ५००० निट्स आहे. आईकू जेड १० मध्ये ९०डब्ल्यूफ्लॅशचार्ज आहे, जो प्रवासात असलेल्या तरुणांसाठी परिपूर्ण आहे. त्याची प्रीमियम डिझाइन स्टायलिश सुव्यवस्थित फ्रेम आणि दुहेरी वक्रांसह येते. हा स्मार्टफोन स्टेलर ब्लॅक आणि ग्लेशियर सिल्व्हर या दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असेल. आईकू जेड १० सोबत, कंपनी आईकू जेड १०एक्स देखील लाँच करत आहे, जो डायमेन्सिटी ७३०० ४एनएम प्रोसेसरद्वारे समर्थित असेल. हा या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन असेल त्यात ६५०० एमएएच हाय-डेन्सिटी बॅटरी असेल.

## चित्रीकरण परवानगीसाठी एक खिडकी प्रणालीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

मुंबई दि.२ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- चित्रीकरणासाठी लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या सुलभरीतीने व मुदतीमध्ये मिळाव्यात या दृष्टीने ऑनलाईन प्रणालीद्वारे एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. मुंबई व उपनगर परिसरात चित्रीकरण परवानगीसाठी एक खिडकी प्रणाली अंतर्गत सात दिवसांत परवानगी मिळणार आहे. या प्रणालीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

विधिमंडळ येथे सांस्कृतिक कार्य विभागाच्या १०० दिवसांची कार्यपुर्ती संदर्भात सादरीकरण करण्यात आले होते. यावेळी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य विभाग मंत्री ॲड आशिष शेलार, उद्योग मंत्री उदय सामंत, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, फिल्म सिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत उद्दिष्ट पुर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीसयांनी विभागाचे अभिनंदन केले.

ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत मुंबई व मुंबई उपनगरातील चित्रपट, टीव्ही मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रीकरणांसाठी एक खिडकी योजनेअंतर्गत आता सात दिवसांत परवानगी मिळणार असल्याची माहिती यावेळी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिली. ‘एक खिडकी प्रणाली ही राज्यभरातील चित्रीकरणाची परवानगी मिळविण्यासाठी निर्माते, निर्मिती संस्थांना आणि लोकेशन मॅनेजर यांना माहिती देणारी एकमेव ऑनलाईन प्रणाली असून महाराष्ट्रभर या प्रणालीचा विस्तार करण्यात आला असून त्या दृष्टीने प्रणालीचे अद्यावतीकरण करण्यात आले आहे. यावेळी सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक दिवंगत नितीन देसाई यांच्या एन डी आर्ट वर्ल्ड परिचालनासाठी महाराष्ट्र शासनाअंतर्गत फिल्मसिटी मुंबईकडे सोपविण्यात आला असून, यासाठीचा धनादेश मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शासमार्फत हा स्टुडिओ दायित्व १२० कोटी व परिचालनासाठी १० कोटी असे १३० कोटी टप्प्याने टप्प्याने प्रदान करण्यात आले असून, दायित्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त विशेष ग्रंथाचे आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या कारकीर्दीतील बारव स्थापत्य या कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

पान १ वरुन

### वक्फ दुरूस्ती विधेयक...

लालू प्रसाद म्हणाले होते- वक्फमध्ये काम करणाऱ्या लोकांनी त्यांच्या मोठमोठ्या जमिनी विकल्या आहेत. त्यांनी पाटण्यातील डाक बंगलाच बळकावला. भविष्यात कठोर कायदे आणावेत अशी आमची इच्छा आहे. चोरी करणाऱ्यांना तुरुंगात पाठवले पाहिजे. काँग्रेसने लालूजींची इच्छा पूर्ण केली नाही, मोदीजींनी ती पूर्ण केली असे अमित शहा म्हणाले.

जेव्हा राम मंदिर बांधण्याचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा असे म्हटले गेले होते की रक्ताच्या नद्या वाहतील आणि मुस्लिम रस्त्यावर येतील. तिहेरी तलाक आणि सीएएच्या बाबतीत असे म्हटले गेले होते की मुस्लिम त्यांचे नागरिकत्व गमावतील. जर दोन वर्षांत एकाही मुस्लिमाने आपले नागरिकत्व गमावले असेल तर आम्ही ते सभागृहात मांडू. कलम ३७० बद्दल त्यांनी काय म्हटले? आज उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री आहेत, विकास होत आहे. मुस्लिमांना घाबरवून काँग्रेसने व्होट बँक निर्माण केली. या देशातील कोणत्याही नागरिकाचे, मग तो कोणताही धर्म असो, नुकसान होणार नाही. हे नरेंद्र मोदी सरकार आहे. ते गेल्या अनेक वर्षांपासून जातीयवाद आणि तुष्टीकरणाविरुद्ध काम करत आहेत. त्यांनी त्यांच्या कुटुंबाचे राजकारण पुढे नेले आहे. २०१४ पासून, नरेंद्र मोदी सरकारने जातीयवाद-तुष्टीकरण-परिवारवाद संपवला आहे आणि विकासाच्या राजकारणाला चालना दिली आहे. मोदीजींना तीन वेळा विजयी केले आहे आणि तिसऱ्यांदा भाजपचे सरकार बनणार आहे.

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांनी काँग्रेसवर हल्लाबोल करत आरोप केला की सत्तेत असताना काँग्रेस पक्षाने वक्फ कायद्यांमध्ये संशयास्पद बदल केले. १२३ प्रमुख इमारती वक्फला दिल्या. जर त्यांना रोखले नसते, तर काँग्रेसप्रणीत युपीए सरकारने संसददेखील वक्फच्या स्वाधीन केली असती,‘‘ असा आरोपही त्यांनी केला. किरण रिजिजू म्हणाले की, १९७० पासून दिल्लीतील काही मालमत्तांबाबत वाद सुरू होता, ज्यात संसद भवनाचाही समावेश होता. दिल्ली वक्फ बोर्डाने या मालमत्तांवर दावा केला होता. हा खटला न्यायालयात होता, पण नंतर सरकारने १२३ मालमत्ता वक्फ बोर्डाला दिल्या. जर आम्ही आज हे दुरुस्ती विधेयक आणला नसते, तर ज्या इमारतीत आपण बसलो आहोत ती संसदही वक्फ मालमत्ता ठरली असती. जर नरेंद्र मोदींचे सरकार सत्तेत आले नसते, तर अजूनही अनेक मालमत्ता वक्फ म्हणून जाहीर केल्या गेल्या असत्या. विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना रिजिजू म्हणाले की, या विधेयकामुळे मशिदींच्या व्यवस्थापनात कोणताही बदल होणार नाही. कोणत्याही धार्मिक भावना दुखावण्याचा सरकारचा हेतू नाही. पूर्वी कोणतीही जमीन वक्फ मालमत्ता म्हणून घोषित केली जाऊ शकत होती, पण आम्ही ती तरतूद काढून टाकली आहे. या नियमाचा इतका गैरवापर झाला की वक्फच्या मालमत्तांची संख्या लाखोंच्या घरात पोहोचली. तामिळनाडूतील सुरेंद्रेश्वर मंदिर वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यात आले. कर्नाटकमध्ये हजारो एकर जमिन वक्फची असल्याचे घोषित केली गेली. हरियाणात एका शीख गुरुद्वाऱ्यालाही वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यात आले.

विरोधी पक्षांनी विधेयकाच्या तरतुदींवर आक्षेप घेत असताना, रिजिजू यांनी त्यांना राजकारण न करण्याचा सल्ला दिला. वक्फ बोर्डांची मालमत्ता खासगी असते, तर रेल्वे व संरक्षण विभागाच्या मालमत्ता राष्ट्रीय संपत्ती असतात,‘‘ असे त्यांनी सांगितले. त्यांनी वक्फ बोर्डांमध्ये महिला प्रतिनिधित्वाचाही मुद्दा उपस्थित केला. या बोर्डांमध्ये महिलांना स्थान नाही, म्हणून आम्ही कमीत कमी दोन महिला सदस्य असतील, अशी तरतूद केली आहे,‘‘ असे रिजिजू म्हणाले.

संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्ण ताकदीने त्याचे समर्थन केले. ते म्हणाले, ‘‘माझ्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्याने मांडलेल्या विधेयकाचे मी समर्थन करतो. दुपारी १२ वाजल्यापासून सुरू असलेली चर्चा मी लक्षपूर्वक ऐकत आहे. मला वाटते की अनेक सदस्यांचे खरोखरच किंवा राजकीय कारणांमुळे अनेक गैरसमज आहेत.’’

वक्फ दुरूस्ती विधेयकावर बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल लोकसभेत म्हटले की, ‘‘महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती.’’

दरम्यान विधेयकावरील चर्चेवेळी भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी जुन्या वक्फ विधेयाकाच्या विरोधात आक्रमक भूमिका मांडली. ते म्हणाले, ‘‘१९५४ मध्ये संसदेच्या सदस्यांनी विधेयकाला विरोध करूनही, काँग्रेस पक्षाने मुस्लिमांना खुश करण्यासाठी वक्फ कायदा मंजूर केला. वक्फला दुसऱ्या कोणत्याही देशात असे अधिकार देण्यात आले नाहीत, तुम्हाला भारताला मुस्लिम राष्ट्र बनवायचे आहे का?’’

दरम्यान या विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी सरकारला घेरल्याचे पाहायला मिळाले. काँग्रेसकडून गोगोई यांचे सभागृहात सत्ताधाऱ्यांकडे पाहत, ‘‘जेव्हा तुम्ही तुम्ही भारत छोडो आंदोलनात सहभागी नव्हता तेव्हा त्यांनी भारत छोडोला पाठिंबा दिला होता. जेव्हा तुम्ही इंग्रजांना माफीनामे लिहित होता, तेव्हा या समुदायातील लोक शहिद होत होते,’’ असे म्हटले.

याचबरोबर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) अरविंद सावंत आणि एमआयएमचे असुद्दिन ओवैसी यांनी वक्फ दुरूस्ती विधेयकावर जोरदार टीका केली.

### वीज दरकपातीच्या निर्णयाला....

चुका आणि विसंगती या वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या नियामक कालावधीतील वीज दराच्या मूळ स्वरूपावर परिणाम करत आहेत. तसेच, हा दर लागू केल्यास विविध प्रकारच्या ग्राहकांना आणि वीज वितरण क्षेत्रातील इतर संबंधित घटकांना मोठे आणि अपरिवर्तनीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे या आदेशावर तातडीने स्थगिती द्यावी अशी मागणी महावितरणने केली आहे.

### दिशा सालियन प्रकरणाची....

राजकारणी असून त्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षात आहेत. त्यामुळे, विविध कारणांमुळे उद्या हे प्रकरण न्यायालयाकडूनच दुसऱ्या खंडपीठासमोर घेऊन जा, असं सांगितलं जाण्याची शक्यता आहे, असे निलेश ओझा यांनी पत्रकार परिषदेतून म्हटले होते. त्यानुसार, याचिकाकर्त्यांची विनंती मान्य करत आता न्यायालयाने ही याचिका दुसऱ्या खंडपीठासमोर चालवण्याचे निर्देश दिले आहेत.

### २५०० किलो अमली पदार्थ जप्त;...

जास्त अंमली पदार्थ (२३८६ किलो हशीश व १२१ किलो हेरोइन) सापडले. या नौकेवर आयएनएस तर्कष युद्धनौकेने यशस्वीरित्या ताबा मिळविला आणि नौकेवरील कर्मचाऱ्यांची त्यांच्या कार्यपद्धतीबाबत तसेच त्या भागात असलेल्या अन्य नौकांबाबत सखोल चौकशी केली.

या जप्ती कारवाईतून समुद्रातील अंमली पदार्थ तस्करीसह इतर बेकायदेशीर कृत्यांचा बीमोड व प्रतिबंध करण्यातील भारतीय नौदलाचे सामर्थ्य आणि व्यावसायिकता अधोरेखित होते.

### अवकाळी पावसाने शेती पिकांचे....

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठी हवामान खात्याकडून ‘यलो अलर्ट’ जारी करण्यात आला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, तसेच मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या भागांत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. यामध्ये मुंबई आणि पुण्यातही हलक्या पावसासह गडगडाट अपेक्षित आहे. विदर्भात चंद्रपूर, गडचिरोलीसह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तापमानात घट होण्याची शक्यता आहे.